॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. परीक्षा/समन्वय/उन्हाळी परीक्षा-२०२६/२०२५-२६/८७१९ दिनांक : २३/०३/२०२६

**पदवी, पदव्युत्तर व बी.व्होक. अभ्यासक्रमांच्या अंतर्गत व प्रात्यक्षिक आणि GE & SEC परीक्षेबाबतचे परिपत्रक**

प्रति,
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नित पदवी, पदव्युत्तर व बी.व्होक. महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: उन्हाळी-२०२६ च्या कला, वाणिज्य व विज्ञान सर्व पदवी, पदव्युत्तर व बी.व्होक. अभ्यासक्रमांच्या अंतर्गत व प्रात्यक्षिक आणि GE & SEC परीक्षेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ च्या कला, वाणिज्य व विज्ञान पदवी, पदव्युत्तर व बी.व्होक. अभ्यासक्रमांना अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षा लागू आहेत, त्या सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक ०१ ते १५ एप्रिल २०२६ दरम्यान आणि सर्व पदव्युत्तर व बी.व्होक. अभ्यासक्रमांच्या अंतर्गत व प्रात्यक्षिक तसेच विज्ञान (CBCS Pattern) शाखेमधील SEC विषयांची परीक्षा दिनांक १६ ते २५ एप्रिल २०२६ दरम्यान घेण्यात याव्यात (**ज्या अभ्यासक्रमांच्या अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षेबाबत परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत त्या व्यतिरिक्त**). त्यास अनुसरून अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावेत. परीक्षा घेतल्यानंतर विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन सादर करण्यासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात येईल. प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण त्या-त्या परीक्षाकडून ऑनलाईन पध्दतीने भरुन घेणे आवश्यक राहील. User Name ऑनलाईन पोर्टलमध्ये Excel File मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. उक्त गुण देत असताना किमान व कमाल गुण हे अभ्यासक्रमात नमूद केल्यानुसारच असल्याची खात्री करून घेण्यात यावी, ही विनंती.

तसेच NEP-2020 Pattern मधील GE & SEC विषयांची परीक्षा थेअरी परीक्षेपूर्वी महाविद्यालय स्तरावर घेऊन सदरील गुण ऑनलाईन पोर्टलवर दिलेल्या कालावधीत सादर करावेत.

उपरोक्त बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

**प्र. संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :
सीनिअर प्रोग्रामर, संगणक कक्ष, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.